दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 मंगळवार , दि. १० मार्च, २०२६ वर्ष - १ अंक - १६४ पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

मंगळवार, दि. १० मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, फाल्गुन मास, कृष्णपक्ष, सप्तमी रात्री १२-५५ पर्यंत
दिवस नक्षत्र– अनुराधा संध्याकाळी ७-०५ पर्यंत
चंद्र रास- वृश्चिक, सूर्य रास = कुंभ,
गुरु रास= मिथुन

### रॅपिडोच्या बाइकवर बंदी

**पुणे**: पश्चिम महाराष्ट्रासह संपूर्ण राज्यात मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या बाइक टॅक्सी सेवांना मोठा धक्का बसला आहे. महाराष्ट्र सरकारने कडक कारवाई करत ओला, उबर आणि रॅपिडो या कंपन्यांच्या बाइक टॅक्सी सेवांवर तात्पुरती बंदी घातली आहे. राज्य सरकारने या कंपन्यांना देण्यात आलेले अस्थायी परवाने तत्काळ रद्द केल्याने सध्या महाराष्ट्रात या कंपन्यांची बाइक टॅक्सी सेवा बंद झाली आहे.

## सारांश वृत्त

### अरुणाचल विधानसभेत पाच विधेयके मंजूर

**इटानगर** : (९ मार्च) अरुणाचल प्रदेश विधानसभेने सोमवारी सभागृहात चर्चेनंतर पाच प्रमुख सरकारी विधेयके आवाजी मतदानाने मंजूर केली, ज्यात अग्निसुरक्षा सेवांशी संबंधित तरतुदी मजबूत करणे, शिक्षण विभागातील पदांचे नियमन करणे, जीएसटी सुधारणा, शहरी नियोजन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी पक्षांतर विरोधी नियम यांचा समावेश होता. चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान ६ मार्च रोजी सभागृहात ही विधेयके सादर करण्यात आली आणि सोमवारी ती विचाराधीन आणि मंजूर झाली.

### बोकारो न्यायालयाला बॉम्बची धमकी

**बोकारो (झारखंड)** : सोमवारी झारखंडच्या बोकारो जिल्हा दिवाणी न्यायालयात रजिस्ट्रारच्या अधिकृत मेल आयडीवर डझनभराहून अधिक बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा ईमेल मिळाल्याने न्यायालयात घबराट पसरली, असे पोलिसांनी सांगितले. एसपी हरविंदर सिंग म्हणाले की, ईमेलमध्ये दावा करण्यात आला आहे की न्यायालयाच्या आवारात १४ 'सायनाइड बॉम्ब' पेरण्यात आले आहेत .

### इतिहासकार के एन पणिक्कर यांचे निधन



**तिरुवनंतपुरम** : प्रख्यात इतिहासकार आणि शिक्षणतज्ज्ञ के.एन. पणिक्कर (९०) यांचे सोमवारी वृद्धापकाळामुळे येथील एका खासगी रुग्णालयात निधन झाले, असे कुटुंबातील सूत्रांनी सांगितले. इतिहासाच्या क्षेत्रातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व असलेले पणिक्कर हे इतिहास लेखनात मार्क्सवादी व्याख्या आणि या क्षेत्रात धर्मनिरपेक्ष आणि वैज्ञानिक दृष्टिकोनांचे समर्थन करण्यासाठी व्यापकपणे ओळखले जात होते.

### पाणी, रस्ते आणि स्वच्छतेवर विशेष भर

# पुणे मनपा: 13,995 कोटींचा अर्थसंकल्प सादर

■ दैनिक राज्य लोकतंत्र





**पुणे** : पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी १३ हजार ९९५ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प स्थायी समितीसमोर सादर केला. या अर्थसंकल्पात पाणीपुरवठा, रस्ते, घनकचरा व्यवस्थापन आणि वाहतूक सुधारणा यांना प्राधान्य देण्यात आले असून शहरातील प्रलंबित विकासकामांना गती देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

या अर्थसंकल्पात सर्वाधिक २०७७ कोटी रुपयांची तरतूद पाणीपुरवठा विभागासाठी करण्यात आली आहे. शहरातील जुनी पाईपलाईन बदलणे, पाणीपुरवठा सुधारणा आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन ही तरतूद करण्यात आली असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

पथ विभागासाठी १८६६ कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवण्यात आला आहे. शहरातील खड्डेमुक्त रस्ते, रस्त्यांचे नूतनीकरण आणि वाहतुकीची सुविधा सुधारण्यासाठी हा निधी वापरण्यात येणार आहे. घनकचरा व्यवस्थापनासाठी १३९० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून स्वच्छता व्यवस्था सुधारण्यावर भर देण्यात आला आहे.

मलनिस्सारण प्रकल्पासाठी १२१६ कोटी रुपयांचा निधी ठेवण्यात आला आहे. त्यामुळे शहरातील जुनी जलनिस्सारण व्यवस्था सुधारून पावसाळ्यात पाणी साचण्याच्या समस्या कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. वाहतूक नियोजनासाठी ७४० कोटी रुपये देण्यात आले असून वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी विविध उपाययोजना राबवण्यात येणार आहेत.

प्राथमिक शिक्षण विभागासाठी ९७९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या शाळांमधील पायाभूत सुविधा सुधारून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यावर भर देण्यात येणार आहे.

याशिवाय भवन रचना विभागासाठी ६५० कोटी, विद्युत विभागासाठी २६५ कोटी, समाज विकासासाठी १४३.५० कोटी, उद्यान विभागासाठी २०५ कोटी, आरोग्य विभागासाठी ८८ कोटी, नगररचना नियोजनासाठी ६४.५० कोटी, पर्यावरणासाठी ५१.५९ कोटी, माहिती व तंत्रज्ञानासाठी ५६.७३ कोटी, हेरिटेज सेलसाठी २८.५० कोटी आणि सांस्कृतिक केंद्रांसाठी १७१.३१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

या अर्थसंकल्पामुळे पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, वाहतूक, शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरण या क्षेत्रांमध्ये सुधारणा होऊन पुणेकरांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. तसेच शहरातील पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठीही या अर्थसंकल्पातून महत्त्वाच्या योजना राबवण्याचे संकेत प्रशासनाने दिले आहेत.

# राज्यसभा बिनविरोध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सात जागांसाठी होणारी निवडणूक बिनविरोध पार पडली आहे. गुरुवारी दाखल झालेल्या नऊ उमेदवारी अर्जांपैकी दोन अपक्ष उमेदवारांचे अर्ज छाननीदरम्यान तांत्रिक कारणांमुळे बाद ठरल्याने सात जागांसाठी सातच उमेदवार उरले. त्यामुळे शरद पवार, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले आणि भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्यासह सातही उमेदवारांच्या बिनविरोध निवडीवर शिक्कामोर्तब झाले.

या निवडणुकीत संख्याबळाच्या आधारावर भाजपला चार जागा मिळाल्या असून शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शरद पवार गट यांना प्रत्येकी एक जागा मिळाली आहे. उमेश म्हात्रे आणि कांते सायन्ना या दोन अपक्ष उमेदवारांनी अर्ज दाखल केला होता. मात्र त्यांच्या अर्जावर सूचक आणि अनुमोदकांच्या सह्या नसल्याने छाननीदरम्यान ते बाद ठरवण्यात आले. त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध झाली.

भाजपने विविध समाजघटकांना प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न केला आहे. नागपूरच्या माजी महापौर माया इवनाते या महत्त्वाचा आदिवासी चेहरा मानल्या जातात. त्या अनुसूचित जमाती राष्ट्रीय आयोगाच्या सदस्या राहिल्या आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या निकटवर्तीय म्हणूनही त्यांची ओळख आहे. विदर्भातील आदिवासी मतदारांपर्यंत पोहोचण्याचा भाजपने प्रयत्न केला आहे. याशिवाय धनगर समाजाचे प्रतिनिधित्व करणारे रामराव वडकुते यांनाही राज्यसभेवर पाठवण्यात आले आहे. त्यांच्या निवडीमुळे पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील धनगर समाजाला प्रतिनिधित्व मिळाल्याचे मानले जात आहे.

# मंत्री पंकजा मुंडेंना न्यायालयाची नोटीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : जालना जिल्हा योजना समितीच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने मंत्री पंकजा मुंडे आणि अन्य सरकारी अधिकाऱ्यांना नोटीस बजावली आहे. जालना जिल्हा योजना समितीचे गठन महाराष्ट्र सरकारने केले असून पंकजा मुंडे या जालना जिल्ह्याच्या प्रभारी मंत्री आहेत.

स्थानिक कार्यकर्ते भाऊसाहेब गोरे यांनी दाखल केलेल्या रिट याचिकेवर ४ मार्च रोजी सुनावणी झाली. या प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती विभा कंकनवाडी आणि न्यायमूर्ती हितेन वेनेगावकर यांच्या खंडपीठासमोर झाली. याचिकाकर्त्यांच्या मते जिल्हा नियोजन समितीची स्थापना कायद्याचे उल्लंघन करून करण्यात आली असून त्यामुळे निधीचे बेकायदेशीर वाटप झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा निधी अपेक्षित उद्देशांसाठी वापरला गेला नसल्याचाही दावा करण्यात आला आहे.

वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, भाऊसाहेब गोरे यांची २२ ऑगस्ट २०२४ रोजीच्या शासकीय आदेशानुसार समितीच्या विशेष आमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मात्र त्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर ते समितीशी संबंधित राहिलेले नाहीत. समितीचे गठन कथितपणे कायद्याच्या तरतुदींनुसार नसल्याची माहिती मिळाल्याने त्यांनी ही याचिका दाखल केल्याचे सांगण्यात आले.

### ५.७६ लाख परीक्षार्थ्यांतून ९५८ जण यशस्वी

# यूपीएससी निकालाचे कठोर वास्तव

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : देशातील सर्वोच्च आणि अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) नागरी सेवा परीक्षेचा अंतिम निकाल नुकताच जाहीर झाला असून या निकालातून स्पर्धेचे अत्यंत कठोर वास्तव पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. एका बाजूला यशस्वी उमेदवारांच्या आनंदाचा उत्सव सुरू असताना, दुसऱ्या बाजूला लाखो उमेदवारांना अपयशाचा सामना करावा लागल्याचे चित्र समोर आले आहे. यंदा देशभरातून तब्बल ५ लाख ७६ हजार ७९३ उमेदवारांनी ही परीक्षा दिली होती. मात्र त्यापैकी केवळ ९५८ उमेदवार अंतिम यादीत स्थान मिळवू शकले आहेत. यामुळे यशाची टक्केवारी अवघी ०.१७ टक्के इतकी राहिली असून, १ टक्क्यापेक्षाही कमी निकाल लागल्याने या परीक्षेतील स्पर्धा किती तीव्र आहे, हे स्पष्ट झाले आहे.

यंदाच्या परीक्षेसाठी एकूण ९ लाख ३७ हजार ८७६ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ५ लाख ७६ हजार ७९३ उमेदवार प्रत्यक्ष पूर्वपरीक्षेला बसले. या टप्प्यातून केवळ १४ हजार १६१ उमेदवारांची मुख्य परीक्षेसाठी निवड झाली. मुख्य परीक्षेनंतर मुलाखतीसाठी फक्त २ हजार ७३६ उमेदवार पात्र ठरले. अखेरच्या टप्प्यात विविध प्रशासकीय सेवांसाठी ९५८ उमेदवारांची शिफारस करण्यात आली असून त्यात ६५९ पुरुष आणि २९९ महिला उमेदवारांचा समावेश आहे.

आकडेवारी पाहिली तर प्रत्येक हजार उमेदवारांमागे केवळ एक ते दोन उमेदवार अंतिम यश मिळवू शकले आहेत. लाखो तरुण-तरुणी या परीक्षेसाठी वर्षानुवर्षे मेहनत घेत असतात. अनेकजण आपल्या आयुष्यातील पाच ते सहा वर्षे पूर्णवेळ तयारीसाठी खर्च करतात. मात्र अंतिम टप्प्यात अपयश आल्यास त्यांच्या करिअरपुढे मोठे प्रश्नचिन्ह उभे राहते. त्यामुळे केवळ एका परीक्षेवर सर्वस्व पणाला लावणे धोक्याचे ठरू शकते, असे मत शिक्षणतज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

दरम्यान, एवढ्या तीव्र स्पर्धेतही महाराष्ट्रातील तरुणांनी आपले अस्तित्व दाखवून दिले आहे. राज्यातील सुमारे ६० उमेदवारांनी अंतिम यादीत स्थान मिळवत राज्याचा झेंडा रोवला आहे. यूपीएससी ही केवळ एक परीक्षा नसून ती उमेदवारांची मानसिक, बौद्धिक आणि संयमाची कसोटी मानली जाते. ९९ टक्क्यांहून अधिक उमेदवारांना अपयशाचा सामना करावा लागत असल्याने या क्षेत्रात तयारी करताना नियोजनबद्ध दृष्टिकोन ठेवणे आवश्यक असल्याचेही जाणकारांचे मत आहे. त्यामुळे यूपीएससीची तयारी करतानाच एमपीएससी, बँकिंग, इतर स्पर्धा परीक्षा, कौशल्य विकास तसेच खासगी क्षेत्रातील करिअरच्या संधींचाही विचार करण्याची गरज तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

### उन्हाळ्याची तीव्रता वेळेआधीच वाढली

# राज्यात १८ जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** :राज्यात यंदा उन्हाळ्याची तीव्रता वेळेआधीच वाढताना दिसत आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच अनेक भागांत तापमानाने पस्तिशी ओलांडली असून पुढील दोन दिवस राज्यातील १८ जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. कमाल तापमान ३८ ते ४० अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन हवामान विभागाने केले आहे.

कोकण आणि मुंबई परिसरातील पालघर, ठाणे आणि मुंबई या जिल्ह्यांसह उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार, जळगाव आणि नाशिक या जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील अहिल्यानगर, तर मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली आणि लातूर या जिल्ह्यांनाही या इशाऱ्यात समाविष्ट करण्यात आले आहे. विदर्भातील अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यांतही तापमानात लक्षणीय वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

राज्यातील बहुतांश भागांत ही उष्णतेची लाट बुधवारपर्यंत सक्रिय राहण्याची शक्यता आहे. मात्र विदर्भातील अकोला आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये ही लाट अधिक काळ टिकून राहण्याचा अंदाज आहे. या दोन्ही जिल्ह्यांमध्ये १८ मार्चपर्यंत तापमान सरासरीपेक्षा ४ ते ५ अंशांनी जास्त राहू शकते, असे हवामान विभागाने सांगितले आहे.

दरम्यान, उष्णतेचा वाढता प्रभाव लक्षात घेता नागरिकांनी पुरेसे पाणी पिणे, शरीरातील पाण्याची कमतरता होऊ न देणे आणि दुपारी १२ ते ३ या वेळेत शक्यतो कडक उन्हात बाहेर जाणे टाळावे, असा सल्ला देण्यात आला आहे. बाहेर पडताना हलके, सुती आणि सैल कपडे वापरणे तसेच छत्री किंवा टोपीचा वापर करावा, असेही सांगण्यात आले आहे. विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांनी अधिक काळजी घेणे आवश्यक आहे, कारण त्यांना उष्माघाताचा धोका अधिक असतो.

उष्ण व दमट वाऱ्यांचा प्रवाह वाढल्यामुळे वातावरणातील आर्द्रतेत वाढ झाली आहे. त्यामुळे तापमानात लक्षणीय वाढ नोंदवली जात असून मार्चच्या दुसऱ्याच आठवड्यात अशी परिस्थिती निर्माण झाल्याने यंदाचा उन्हाळा अधिक तीव्र राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

### शरजील इमामला अंतरिम जामीन

**नवी दिल्ली** : २०२० मधील दिल्ली दंगल प्रकरणातील आरोपी आणि कार्यकर्ता शरजील इमाम याला त्यांच्या भावाच्या लग्नाला उपस्थित राहण्यासाठी न्यायालयाने १० दिवसांचा अंतरिम जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणावर अतिरिक्त सत्र न्यायाधीश समीर बाजपेयी यांच्या न्यायालयात सोमवारी सुनावणी झाली. भावाच्या लग्नासाठी सहा आठवड्यांचा अंतरिम जामीन देण्याची मागणी करत इमाम याने अर्ज दाखल केला होता. सुनावणीनंतर न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, इमाम याला २० मार्च ते ३० मार्च या कालावधीत अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला आहे.

# निलंबनानंतर आयएस एमडी सिंग यांची दिलगिरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी सभागृहात माहिती देण्यासाठी बोलावलेल्या ब्रिफींग साठी बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी तथा पर्यावरण विभागाचे सचिव गैरहजर राहिल्याने सभागृहात हा विषय पटलावर आल्यानंतर एमडी सिंह याना निलंबित करण्याचे आदेश सभाग्रचे तालिका अध्यक्षांनी दिले होते मात्र त्यानंतर एमडी सिंग यांनी झालेल्या चुकीबद्दल दिलगिरी व्यक्त केल्याने त्यांच्यावर करण्यात आलेली निलंबनाची कारवाई आता टळण्याची शक्यता आहे.

मंत्री पंकजा मुंडेंनी सांगितलं की, माझ्या आदेशानंतरही आयएएस अधिकारी एम. देवेंद्र सिंग हे ब्रीफिंगसाठी हजर राहिले नाही. या गंभीर विषयाची दखल घेत अखेर त्यांचं निलंबन करण्यात आलं होतं. याप्रकरणी, तालिका अध्यक्ष दिलीप लांडे यांनी निलंबनाचे आदेश दिले होते. त्यानुसार, सामान्य प्रशासन विभागाकडून त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली होती. अशातच या कारवाई संदर्भात एक महत्वपूर्ण बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम. देवेंद्र सिंग आणि सहसंचालक सतीश पडवळ यांच्या निलंबन मागे घेण्याची शक्यता आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनातं बोलताना भाजपचे जेष्ठ नेते आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेत एमपीसीबीचे अधिकारी एम देवेंद्र सिंग यांच्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला. आयएएस अधिकारी एम. देवेंद्र सिंग यांनी पुरावे सादर करत घडलेल्या प्रकाराबाबत दिलगिरी व्यक्त केली आहे. अशी माहिती मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सभागृहात दिली.

यावर विधानसभा अध्यक्ष म्हणाले की, हे निलंबन मागे घेण्याच्या संदर्भात कार्यवाही करावी. अशातच यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या संदर्भात कार्यवाही केली जाईल. त्यामुळे आता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम. देवेंद्र सिंग यांचे निलंबन मागे घेण्याची शक्यता आहे.

### आवश्यक सर्वेक्षण, कागदपत्रांची पूर्तता आणि प्राथमिक मंजुरीची प्रक्रिया जवळपास पूर्ण

# पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी भूसंपादनाची तयारी पूर्ण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : पुरंदर तालुक्यात प्रस्तावित असलेल्या पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी भूसंपादनाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. जिल्हा प्रशासनाने यासाठी आवश्यक सर्वेक्षण, कागदपत्रांची पूर्तता आणि प्राथमिक मंजुरीची प्रक्रिया जवळपास पूर्ण केली असून निधी उपलब्ध होताच भूसंपादनाला सुरुवात केली जाणार आहे.

या प्रकल्पासाठी पुरंदर तालुक्यातील पारगाव, एकहतपूर, मुंजेवाडी, कुंभारवळण आणि आसपासच्या गावांतील जमीन आवश्यक आहे. संबंधित भागातील जमिनींचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले असून जमीनमालकांशी संवाद साधून त्यांना भूसंपादन प्रक्रियेची माहिती देण्याचे काम प्रशासनाकडून सुरू आहे.

जिल्हा प्रशासनाच्या माहितीनुसार, विमानतळासाठी लागणाऱ्या हजारो एकर जमिनीचे मोजमाप, मालकी हक्कांची पडताळणी तसेच महसुली नोंदींची छाननी पूर्ण करण्यात आली आहे. पुढील टप्प्यात प्रत्यक्ष भूसंपादन प्रक्रिया राबवून जमीनमालकांना मोबदला देण्याची कार्यवाही सुरू केली जाणार आहे. या प्रक्रियेत महसूल विभाग, विमानतळ प्राधिकरण आणि राज्य शासन यांच्यात समन्वय ठेवला जात आहे.

भूसंपादनासाठी आवश्यक निधी मिळताच अधिग्रहणाची प्रक्रिया तातडीने सुरू होणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तसेच शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा यासाठी शासनाकडून विशेष पॅकेजचा विचारही सुरू असल्याची माहिती देण्यात आली.

दरम्यान, हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पुणे आणि परिसरातील उद्योग, आयटी क्षेत्र, पर्यटन तसेच व्यापाराला मोठी चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मितीही होण्याची शक्यता आहे.

सध्या पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ लष्कराच्या ताब्यात असल्यामुळे त्याच्या विस्ताराला मर्यादा आहेत. भविष्यातील वाढती हवाई वाहतूक लक्षात घेऊन नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याची योजना राज्य सरकारने आखली आहे. त्यामुळे पुरंदर विमानतळ प्रकल्पाला पुणे जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रकल्प मानले जात आहे.

# रिक्षा चालकांचा परवाना होणार महाग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : एकीकडे बांगलादेशी नागरिकांना भारतातून हद्दपार करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. तर दुसरीकडे अनेक बांगलादेशी नागरिकांनी अवैधरित्या रिक्षाचा परवाना मिळाल्याच्या तक्रारी करण्यात येत आहे. या तक्रारींची दखल घेऊन, तसेच वाढती वाहतूक कोंडी आणि प्रदूषण रोखण्यासाठी नव्या रिक्षा परवान्यांना सोमवारपासून स्थगिती देण्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक केली.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, राज्यातील अनेक मोठ्या शहरांमध्ये ऑटो रिक्षांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. यामुळे वाहतुकीवर मोठा ताण निर्माण होत असून ट्रॅफिक जामची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. विशेषतः मुंबई आणि उपनगरांमध्ये रिक्षांची संख्या प्रचंड वाढल्याने वाहतूक व्यवस्थापन अधिक कठीण झाले आहे. शहरांमधील रस्त्यांची क्षमता आणि वाहनांची वाढती संख्या यामध्ये मोठा तफावत निर्माण झाल्यामुळे काही काळासाठी नवीन परवाने देण्याची प्रक्रिया थांबवणे आवश्यक असल्याचे सरकारचे मत आहे.या निर्णयाबाबत केंद्र सरकारशी पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यानंतररस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने राज्य सरकारला स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचा सल्ला दिला आहे. मोटार वाहन (सुधारणा) कायदा २०१९ अंतर्गत राज्य सरकारला वाहतूक व्यवस्थेचे नियमन करण्यासाठी आवश्यक अधिकार देण्यात आले आहेत.

## संपादकीय

# युद्धातील भारताचे अकाली मौन



**पश्चिम आशियात इस्रायल आणि अमेरिकेच्या कारवाईनंतर सुरू झालेला संघर्ष झपाट्याने विस्तारत आहे. इराण आणि त्याच्या परिसरात वाढणाऱ्या युद्धछायेत अनेक देश आपली भूमिका स्पष्ट करत आहेत. मात्र भारताचा प्रतिसाद संयतच नव्हे तर काहीसा मूक असल्याची चर्चा वाढू लागली आहे.**

पश्चिम आशियातील संघर्ष हा जगासाठी नवा नाही. या प्रदेशात युद्ध, राजकीय अस्थिरता आणि महासत्तांचे हस्तक्षेप ही जणू इतिहासाची सवयच झाली आहे. परंतु इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर केलेल्या अलीकडील कारवाईनंतर परिस्थितीने नव्या टप्प्यात प्रवेश केला आहे. हा संघर्ष केवळ दोन-तीन देशांपुरता मर्यादित राहिलेला नाही; त्याचे पडसाद संपूर्ण प्रदेशात उमटू लागले आहेत. अशा वेळी अनेक देशांनी आपली भूमिका स्पष्ट केली. काहींनी ठाम पाठिंबा दिला, काहींनी निषेध व्यक्त केला, तर काहींनी मध्यस्थीची भूमिका घेतली. भारत मात्र या घडामोडींमध्ये काहीसा संकोचलेला दिसतो. भारताची परराष्ट्रनीती परंपरेने संतुलनावर आधारित राहिली आहे. पश्चिम आशियातील परस्परविरोधी गटांमध्ये संवाद ठेवण्याची क्षमता भारताने दीर्घकाळ जपली. इस्रायलशी संरक्षण आणि तंत्रज्ञान सहकार्य, अरब देशांशी ऊर्जा व व्यापारसंबंध आणि इराणशी धोरणात्मक संवाद या तिन्ही स्तरांवर भारताने एक प्रकारची समतोल भूमिका निर्माण केली होती. त्यामुळे या प्रदेशात भारताला काही प्रमाणात विश्वासार्ह मध्यस्थ म्हणूनही पाहिले जात असे. मात्र, अलीकडील घडामोडींनी या संतुलनावर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. इस्रायलवरील हल्ल्यांचा निषेध करताना भारताने स्पष्ट भूमिका घेतली, हे अपेक्षितच होते. परंतु त्यानंतरच्या कारवायांमध्येही तीच भूमिका कायम राहिल्याचे दिसते. गाझामधील विध्वंस, नागरिकांचे बळी आणि वाढती मानवी संकटे याबद्दल भारताचा आवाज तुलनेने मृदू राहिला. परिणामी भारत एका बाजूला झुकत असल्याची धारणा निर्माण झाली. इराणवरील अलीकडील कारवाईनंतर ही धारणा अधिक बळकट झाली. अमेरिकेच्या नेतृत्वाखाली झालेल्या या लष्करी कारवाईमुळे संपूर्ण प्रदेश अस्थिर झाला आहे. इराणने प्रत्युत्तर देताना अनेक अमेरिकन तळांवर हल्ले केले. त्याचे परिणाम जॉर्डन, कतार, बहरीन, कुवेत आणि सौदी अरेबिया यांसारख्या देशांपर्यंत पोहोचले. संघर्षाचा व्याप वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अशा परिस्थितीत भारतासारख्या मोठ्या देशाने स्पष्ट आणि संतुलित भूमिका मांडणे अपेक्षित होते. कारण भारताचे या प्रदेशाशी असलेले संबंध केवळ राजनैतिक नाहीत; ते अत्यंत व्यावहारिक आहेत. पश्चिम आशियात सुमारे एक कोटी भारतीय काम करतात. त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न भारतासाठी महत्त्वाचा आहे. ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीनेही हा प्रदेश निर्णायक आहे. भारताच्या तेल आयातीपैकी मोठा भाग या भागातून येतो. व्यापार, गुंतवणूक आणि पायाभूत प्रकल्प यांमधूनही भारताचे हितसंबंध या प्रदेशाशी जोडलेले आहेत. इराणशी असलेले संबंधही त्यात महत्त्वाचे आहेत. चाबहार बंदर प्रकल्प हा भारताच्या मध्य आशियाकडे जाणाऱ्या धोरणाचा एक महत्त्वाचा दुवा मानला जातो. या प्रकल्पात भारताने मोठी गुंतवणूक केली आहे. त्यामुळे इराणशी संवाद आणि विश्वास कायम ठेवणे भारतासाठी आवश्यक आहे. परंतु सध्याच्या परिस्थितीत भारताची भूमिका अस्पष्ट राहिल्याने त्या संबंधांवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. परराष्ट्रनीतीत अनेकदा संयम हा गुण मानला जातो. परंतु संयम आणि मौन यामध्ये सूक्ष्म फरक असतो. संयम म्हणजे परिस्थितीचा विचार करून संतुलित भूमिका मांडणे; मौन म्हणजे प्रतिक्रिया देण्याचे टाळणे. या संदर्भात भारताच्या अलीकडील परराष्ट्र धोरणातील बदल लक्षात घ्यावे लागतात. गेल्या दशकात भारताने इस्रायलशी संबंध अधिक दृढ केले. संरक्षण सहकार्य, तंत्रज्ञान आणि गुप्तचर सहकार्य या क्षेत्रांत दोन्ही देशांमध्ये जवळीक वाढली. त्याच वेळी अरब देशांशीही भारताने आर्थिक संबंध विस्तारले. त्यामुळे भारताला या सर्व देशांमध्ये संवाद राखण्याची संधी होती. मात्र या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारताने मध्यस्थीची कोणतीही सक्रिय भूमिका घेतलेली दिसत नाही. संयुक्त राष्ट्रांसारख्या मंचांवर भारताचा आवाज मर्यादित राहिला आहे. यामुळे भारताची पारंपरिक 'संतुलित शक्ती' अशी ओळख काहीशी धूसर होत आहे. युद्धाच्या काळात राजनैतिक भूमिकांचे महत्त्व अधिक असते. कारण युद्ध केवळ रणांगणावर लढले जात नाही; ते कूटनीतीच्या टेबलावरही लढले जाते. या प्रक्रियेत मध्यस्थी करू शकणाऱ्या देशांचे महत्त्व वाढते. भारताने पूर्वी अनेक प्रसंगी अशी भूमिका निभावली आहे. त्यामुळे सध्याच्या संघर्षातही त्याच्याकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या जात होत्या. पश्चिम आशियातील युद्धाचा परिणाम केवळ त्या प्रदेशापुरता मर्यादित राहणार नाही. ऊर्जा बाजारपेठा, जागतिक व्यापार आणि भू-राजकीय समीकरणे यावर त्याचे दूरगामी परिणाम होतील. अशा वेळी भारताने आपल्या हितसंबंधांचे रक्षण करताना संतुलित आणि स्पष्ट भूमिका मांडणे आवश्यक आहे. कारण मोठ्या देशाची ओळख केवळ त्याच्या आर्थिक किंवा लष्करी ताकदीत नसते; ती त्याच्या आवाजात असते. त्या आवाजात जर स्पष्टता आणि संतुलन असेल तरच त्याला आंतरराष्ट्रीय राजकारणात वजन प्राप्त होते. पश्चिम आशियातील या संघर्षाने भारतासमोर अशीच कसोटी उभी केली आहे.

# ममता : राजशिष्टाचार की राजकारण?



» **लोकशाही व्यवस्थेत राजकीय मतभेद असले तरी काही परंपरा या संस्थात्मक सन्मानाशी निगडित असतात. राष्ट्रपतींच्या राज्यभेटीच्या वेळी घडलेली बंगालमधील घटना ही औपचारिकतेचा प्रश्न नाही; तर ती शिष्टाचार, राजकीय संकेत आणि सत्तेच्या भाषेतील सूक्ष्म बदल यांकडे लक्ष वेधते.**

राजकीय व्यवस्थांमध्ये काही नियम कायद्याने ठरलेले असतात आणि काही परंपरेने. दोन्हींच्या सीमारेषेवर उभा असतो तो 'प्रोटोकॉल' हा शब्द. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती किंवा पंतप्रधान एखाद्या राज्यात येतात तेव्हा त्यांचे स्वागत कसे करायचे, कोण उपस्थित राहणार, कोणत्या क्रमाने औपचारिकता पार पडणार याचा तपशील प्रोटोकॉलमध्ये दिलेला असतो. परंतु त्यामागे केवळ नियम नसतात; संघराज्य व्यवस्थेतील परस्पर आदराचे सूक्ष्म संकेतही त्यात दडलेले असतात.

पश्चिम बंगालमध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या भेटीदरम्यान घडलेली घटना त्यामुळे चर्चेचा विषय ठरली. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी स्वतः स्वागतासाठी उपस्थित राहिल्या नाहीत, ही बाब तितकी अनोखी नाही. अनेकदा मुख्यमंत्री इतर कार्यक्रमांमुळे अनुपस्थित राहतात. परंतु त्यांच्या वतीने एखाद्या मंत्र्याची नियुक्ती न करणे हे मात्र दुर्मीळ मानले जाते. राज्यशिष्टाचाराच्या चौकटीत ही बाब अपवादात्मक ठरते.

या संपूर्ण प्रक्रियेचा आधार असतो केंद्रीय गृह मंत्रालयाने तयार केलेले 'ब्लू बुक'. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि पंतप्रधान यांच्या भेटींच्या सर्व व्यवस्था या पुस्तकानुसार केल्या जातात. वेळोवेळी अद्ययावत केले जाणारे हे मार्गदर्शक दस्तऐवज प्रत्येक राज्य प्रशासनाकडे पाठवले जाते. प्रत्येक प्रतीला क्रमांक दिलेला असतो आणि जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी तसेच जिल्हा पोलिस प्रमुख यांच्या ताब्यात त्याची प्रत ठेवली जाते.

या ब्लू बुकमध्ये मान्यवरांच्या भेटीचा संपूर्ण आराखडा दिलेला असतो. सुरक्षा, मार्गक्रमण, स्वागत समारंभ, अधिकृत भेटीगाठी प्रत्येक बाबीचा सूक्ष्म तपशील त्यात नोंदवलेला असतो. विमानतळावर किंवा रेल्वे स्थानकावर कोण स्वागत करणार, कोणत्या क्रमाने परिचय होणार, कोणत्या अधिकाऱ्यांना उपस्थित राहायचे याची संपूर्ण यादी आधीच निश्चित केली जाते.

नियमांच्या दृष्टीने पाहिले तर राष्ट्रपतींचे स्वागत करणे हे मुख्यमंत्र्यांसाठी कायदेशीरदृष्ट्या अनिवार्य नाही. परंतु परंपरेने राज्यपाल आणि मुख्यमंत्री हे दोघेही स्वागतासाठी उपस्थित राहतात. मुख्यमंत्री अनुपलब्ध असतील तर त्यांच्या वतीने एखाद्या मंत्र्याची नियुक्ती केली जाते. अशा प्रकारे औपचारिकतेचा सन्मान राखला जातो.

इतर राज्यांमध्येही अशीच पद्धत दिसते. उदाहरणार्थ, उत्तर प्रदेशात गेल्या वर्षी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू मथुरेला भेट देण्यासाठी आल्या असताना राज्यपाल आनंदीबेन पटेल किंवा मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ दोघेही विमानतळावर उपस्थित नव्हते. मात्र मुख्यमंत्री योगी यांनी आपल्या मंत्रिमंडळातील लक्ष्मी नारायण चौधरी यांना राष्ट्रपतींचे स्वागत करण्यासाठी नियुक्त केले होते.

त्यामुळे प्रोटोकॉलची परंपरा अबाधित राहिली. यापूर्वी समाजवादी पक्षाच्या सरकारच्या काळातही अशीच व्यवस्था केली जात असे. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर २०१४ ते २०१७ या काळात ते उत्तर प्रदेशात अनेकदा आले. त्या वेळी तत्कालीन मुख्यमंत्री अखिलेश यादव काही वेळा स्वतः उपस्थित राहू शकत नसत. तेव्हा त्यांच्या वतीने एखादा मंत्री स्वागतासाठी पाठवला जाई. तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या भेटीदरम्यानही हीच पद्धत पाळली गेली होती.

पश्चिम बंगालमध्ये मात्र यापूर्वी अशा प्रकारची परिस्थिती उद्भवली नव्हती. २०२१ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राज्यदौऱ्यावेळी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी चक्रीवादळासंदर्भातील बैठकीला अनुपस्थित राहणे पसंत केले होते. त्या वेळी केंद्र आणि राज्य यांच्यातील तणावही स्पष्ट दिसत होता. तरीही त्या विमानतळावर जाऊन पंतप्रधानांचे स्वागत करून गेल्या होत्या. यावरून स्वागताच्या औपचारिकतेचा किमान संकेत तरी जपला गेला होता.

यामुळे सध्याच्या घटनेचे महत्त्व वाढते. कारण ब्लू बुकचे नियम अत्यंत कठोर मानले जातात. स्वागतासाठी उपस्थित राहणाऱ्या व्यक्तींची यादी आधीच राष्ट्रपती भवन, उपराष्ट्रपती कार्यालय किंवा पंतप्रधान कार्यालयाकडे पाठवली जाते. त्यानंतरच अंतिम मंजुरी दिली जाते. त्यामुळे या प्रक्रियेत कोणताही बदल झाला तर त्याची नोंद घेतली जाणे स्वाभाविक असते.

राजकीय व्यवस्थेत प्रोटोकॉल हे अनेकदा औपचारिक वाटू शकते. परंतु त्यामागे संस्थांचा सन्मान राखण्याची भावना असते. राष्ट्रपती हे संविधानिकदृष्ट्या संपूर्ण देशाचे प्रतिनिधित्व करणारे पद आहे. त्यामुळे त्यांच्याशी संबंधित औपचारिकता ही केवळ व्यक्तीपुरती मर्यादित राहत नाही; ती संस्थेच्या मानमरातबाशी जोडलेली असते. म्हणूनच, पश्चिम बंगालमध्ये घडलेली ही घटना केवळ स्वागताच्या अनुपस्थितीपुरती मर्यादित राहत नाही. ती संघराज्य व्यवस्थेतील बदलत्या राजकीय भाषेचे द्योतक म्हणूनही पाहावी लागेल. आज केंद्र आणि राज्य यांच्यातील संबंध अधिकाधिक राजकीय होत चालले आहेत. या पार्श्वभूमीवर प्रोटोकॉलचे संकेत कधी औपचारिकतेत राहतात आणि कधी राजकीय संदेशात रूपांतरित होतात, हे ओळखणे अधिक महत्त्वाचे ठरते.

# पीएमआरडीएचे सात मोठे प्रकल्प अजूनही रखडले

## रिंगरोड, नदी सुधारणा, लोणावळा स्कायवॉक कागदावरच

■ दैनिक राज्य लोकतंत्र



नदी सुधारणा प्रकल्प | लोणावळा स्कायवॉक

**पिंपरी :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून सुमारे दीड वर्षांपूर्वी सात महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र भूसंपादन, निविदा प्रक्रिया आणि तांत्रिक अहवालांतील विलंब यांसारख्या कारणांमुळे या प्रकल्पांपैकी एकाही कामाला अद्याप प्रत्यक्ष सुरुवात झालेली नाही. परिणामी रिंगरोड, नदी सुधारणा आणि लोणावळा स्कायवॉकसह अनेक महत्त्वाचे प्रकल्प अजूनही कागदावरच असल्याचे चित्र आहे.

वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी महत्त्वाचा मानला जाणारा रिंगरोड प्रकल्प जिल्ह्यातील सर्वात मोठ्या पायाभूत प्रकल्पांपैकी एक आहे. या प्रकल्पात एकूण ९६ घटकांचा समावेश असून त्याचा पहिला टप्पा सोळू ते वाघोली या मार्गावर प्रस्तावित आहे. प्रत्यक्षात सोळू ते वडगाव शिंदे हा सुमारे ४.७ किलोमीटरचा पहिला टप्पा असला तरी भूसंपादनाच्या अडचणी आणि काही शेतकऱ्यांचा विरोध यामुळे या कामाला अपेक्षित गती मिळालेली नाही.

वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी जिल्ह्यातील १७ ठिकाणी जंक्शन सुधारणा करण्याचा प्रस्तावही पीएमआरडीएकडून मांडण्यात आला होता. मात्र या प्रकल्पासाठी आवश्यक असलेला सविस्तर अहवाल तयार न झाल्याने आणि पुढील कार्यवाही न झाल्याने हा दोन वर्षांचा प्रकल्पही अद्याप कागदावरच राहिला आहे. याशिवाय पार्किंग व्यवस्थेचा प्रश्न सोडवण्यासाठी सुमारे ३७० कोटी रुपयांचा मल्टी मॉडेल हब उभारण्याची संकल्पनाही मांडण्यात आली होती. मात्र जागेचे संपादन आणि काही कायदेशीर अडचणींमुळे हा प्रकल्पही पुढे सरकलेला नाही.

नदी सुधारणा प्रकल्पांतर्गत इंद्रायणी, पवना आणि मुळामुठा या महत्त्वाच्या नद्यांमधील प्रदूषण कमी करण्यासोबतच नदीकाठाचा विकास करण्याचे नियोजन होते. या प्रकल्पासाठी पीएमआरडीएकडून केंद्र सरकारकडे पाठपुरावाही करण्यात आला होता. तरीही या योजनेला अद्याप प्रत्यक्षात सुरुवात झालेली नाही.

याशिवाय लोणावळ्यातील टायगर आणि लायन्स पॉईंट येथे प्रस्तावित ग्लास स्कायवॉक, जिल्ह्यातील विविध भागांत ११ अग्निशमन केंद्रे उभारणे, देहू घाट विकास, फुटबॉल टर्फ तसेच वाघोली पाणीपुरवठा योजना असे अनेक प्रकल्पही अद्याप प्रत्यक्षात सुरू झालेले नाहीत.

दरम्यान, अनेक प्रकल्पांना गती देण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी सांगितले. काही प्रकल्प सध्या निविदा प्रक्रियेत असून पुढील वर्षभरात त्यापैकी काही प्रकल्प पूर्ण होतील. तसेच मेट्रो आणि रिंगरोड प्रकल्पांनाही गती मिळत असून ते निश्चितच पूर्णत्वास जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# भिशीच्या आमिषाने चार कोटींची फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** गुंतवणुकीवर भरघोस परतावा देण्याचे आमिष दाखवत एका कुटुंबाने शेकडो गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी हिंजवडी पोलिस ठाण्यात एका महिलेसह चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून तपास सुरू आहे.

ही घटना १५ मे २०२३ ते ७ मार्च २०२६ या कालावधीत मुळशी तालुक्यातील माण येथे घडली. याबाबत एका व्यक्तीने हिंजवडी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी फिर्यादी तसेच इतर गुंतवणूकदारांना शेअर मार्केट आणि भिशीच्या नावाखाली पैसे गुंतवण्यास प्रवृत्त केले. दरमहा ४ ते ५ टक्के परतावा मिळेल, असे सांगत त्यांनी अनेकांकडून मोठ्या प्रमाणावर रक्कम जमा करून घेतली.

फिर्यादींकडून ५७ लाख ६ हजार रुपये तर इतर गुंतवणूकदारांकडून ३ कोटी ५९ लाख १४ हजार ८९२ रुपये अशी एकूण ४ कोटी १६ लाख २० हजार ८९२ रुपयांची रक्कम जमा करण्यात आली. मात्र गुंतवणुकीवरील कोणताही परतावा न देता तसेच मूळ रक्कमही न परतवता आरोपींनी गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

# चार वर्षांनंतर महापालिकेच्या कामकाजाला गती

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या महापौर, उपमहापौरांसह विविध विषय समिती सभापतींची निवड प्रक्रिया पूर्ण झाली असून चार वर्षांनंतर महापालिकेच्या दैनंदिन कामकाजाला गती मिळू लागली आहे. सर्व पदाधिकाऱ्यांची निवड झाल्याने महापालिकेत नगरसेवक, त्यांचे समर्थक, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिकांची वर्दळ वाढली आहे. प्रशासकीय राजवटीत रखडलेली तसेच प्रलंबित कामे आणि प्रकल्प आता मार्गी लागतील, अशी अपेक्षा शहरवासीयांकडून व्यक्त केली जात आहे.

महापालिकेची निवडणूक १५ जानेवारी २०२६ रोजी पार पडली. या निवडणुकीत सलग दुसऱ्यांदा भाजपने सत्ता मिळवली. ६ फेब्रुवारी रोजी महापौरपदी रवी लांडगे तर उपमहापौरपदी शर्मिला बाबर यांची बिनविरोध निवड झाली. सत्तारूढ पक्षनेतेपदी प्रशांत शितोळे यांची निवड झाली असून विरोधी पक्षनेतेपदी भाऊसाहेब भोईर यांची नियुक्ती करण्यात आली. २८ फेब्रुवारी रोजी स्थायी समिती अध्यक्षपदी अभिषेक बारणे यांची निवड झाली. त्यानंतर १ मार्च रोजी विविध विषय समिती सभापतींची निवड प्रक्रिया पूर्ण झाली.

पदाधिकाऱ्यांसह विविध समित्यांच्या सभापतींची निवड झाल्यानंतर महापालिकेच्या कामकाजाला वेग आला आहे. नव्या सभापतींनी आपापल्या विभागांतील कामांचा आढावा घेण्यास सुरुवात केली असून शहरातील विविध भागांत पाहणी दौरेही सुरू केले आहेत. समिती सदस्य आणि नगरसेवक अधिकाऱ्यांसोबत प्रभागांतील समस्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यावर भर देत आहेत. त्यामुळे प्रलंबित तसेच रखडलेली कामे आणि प्रकल्पांना गती मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

विविध विषय समित्यांच्या साप्ताहिक बैठका सुरू झाल्याने नवीन विषयांना मंजुरी मिळू लागली आहे. पदाधिकाऱ्यांकडे कामे, तक्रारी आणि निवेदने देण्यासाठी नागरिक तसेच सामाजिक कार्यकर्त्यांची महापालिका भवनात ये-जा वाढली आहे. त्यामुळे महापालिका भवन पुन्हा एकदा गजबजू लागले आहे. अधिकारी वर्गही आता अधिक सक्रिय झाल्याचे दिसत आहे.

## नोंदणी झालेल्या सर्व रुग्णांना मोफत उपचार

# अटल महाआरोग्य शिबिराला रेकॉर्डब्रेक प्रतिसाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** सेवा आणि सामाजिक बांधिलकीचा महाकुंभ ठरलेल्या 'अटल महाआरोग्य शिबिरा'ला यंदा नागरिकांचा रेकॉर्डब्रेक प्रतिसाद मिळाला. गेल्या ११ वर्षांची परंपरा कायम ठेवत यावर्षीही मोठ्या संख्येने रुग्णांची नोंदणी झाली. विशेष म्हणजे शिबिरात नोंदणी झालेल्या सर्व रुग्णांच्या पुढील उपचारांचा आणि शस्त्रक्रियांचा संपूर्ण खर्च या उपक्रमातून उचलला जाणार असल्याची माहिती आमदार शंकर जगताप यांनी दिली.

शिबिराच्या समारोपप्रसंगी राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार उमा खापरे, तांत्रिक सेवा महाराष्ट्र राज्य (सीआयडी) पोलिस अधीक्षक वैशाली माने, भाजप पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, पक्षनेते प्रशांत शितोळे यांच्यासह भाजपचे नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. समारोपाच्या कार्यक्रमात विविध आरोग्य संस्थांचे प्रतिनिधी, ८५ हून अधिक रुग्णालयांतील मान्यवर डॉक्टर, परिचारिका आणि रुग्णालय कर्मचारी यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी आमदार शंकर जगताप म्हणाले की, अटल महाआरोग्य शिबिर हे सामाजिक बांधिलकीचे एक व्यापक व्यासपीठ बनले आहे. गेल्या ११ वर्षांच्या प्रवासात लाखो नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घेतला आहे. या शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे येथे केवळ प्राथमिक तपासणी केली जात नाही, तर पुढील उपचारांपासून मोठ्या व गुंतागुंतीच्या तसेच दीर्घकालीन शस्त्रक्रियांपर्यंत सर्व सेवा रुग्णांना उपलब्ध करून दिल्या जातात. दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनासाठी आवश्यक साधने आणि औषधेही मोफत दिली जातात.

समारोपप्रसंगी राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक केले. मंत्री माधुरी मिसाळ आणि आमदार उमा खापरे यांनी उपस्थित राहून रुग्णांशी संवाद साधला तसेच साहित्य वाटपाच्या उपक्रमात सहभाग घेतला.

दरम्यान, अटल महाआरोग्य शिबिराच्या निमित्ताने पिंपरी-चिंचवडमध्ये 'एचपीव्ही' (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण मोहिमेचाही शुभारंभ करण्यात आला. महिलांमधील गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाला प्रतिबंध करण्यासाठी ही लस अत्यंत प्रभावी मानली जाते.

# पिंपरीत एनसीएमसी स्मार्ट कार्ड नोंदणीला प्रतिसाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवाशांच्या सोयीसाठी राष्ट्रीय कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) स्मार्ट कार्ड सेवा सुरू केली असून पिंपरी-चिंचवडमधील वल्लभनगर आगारात या कार्ड नोंदणीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या नोंदणी प्रक्रियेत दररोज सुमारे १२० ते १५० प्रवासी नोंदणी करत असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

एसटी बसमध्ये प्रवास करताना विविध सवलतींचा लाभ घ्यायचा असल्यास एनसीएमसी स्मार्ट कार्ड काढणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे वल्लभनगर आगारात सकाळपासूनच प्रवाशांच्या रांगा लागत आहेत. विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.

मात्र आगारात सध्या केवळ एकच नोंदणी काउंटर उपलब्ध असल्याने प्रवाशांना दीर्घ प्रतीक्षा करावी लागत आहे. एका नोंदणीस साधारण पाच ते सहा मिनिटांचा कालावधी लागत असल्यामुळे अनेकांना चार ते पाच तास रांगेत थांबावे लागत आहे. त्यामुळे काही प्रवाशांकडून नाराजीही व्यक्त होत असून नोंदणीसाठी अधिक कर्मचारी नियुक्त करावेत, अशी मागणी करण्यात येत आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### बेकायदेशीर पान टपऱ्यांचा सुळसुळाट

**पुणे** : पुणे शहर तसेच जिल्ह्यातील रस्ते, हायवे, शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात आणि सार्वजनिक ठिकाणी बेकायदेशीर पान टपऱ्यांचा सुळसुळाट झाल्याचे चित्र समोर आले आहे. या टपऱ्यांमधून नशिले पान, तंबाखूजन्य पदार्थ आणि आरोग्यास अपायकारक वस्तूंची खुलेआम विक्री होत असल्याने विशेषतः शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये व्यसनाधीनतेचा धोका वाढत असल्याची गंभीर चिंता व्यक्त करण्यात येत आहे. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत गोविंद वारघडे यांनी महाराष्ट्र राज्याचे पोलिस महासंचालक, पुणे शहराचे पोलिस आयुक्त, पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक, झोन क्रमांक ७ चे पोलिस उपायुक्त तसेच वाघोली आणि लोणिकंद पोलिस ठाण्यांचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक आणि अन्न व औषध प्रशासन विभाग यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

### सिंहगड किल्ल्यावर पर्यटकांवर मधमाशांचा हल्ला

**पुणे** : किल्ले सिंहगड येथे पर्यटकांवर मधमाशांच्या मोहळाने अचानक हल्ला केल्याची घटना समोर आली असून या घटनेत काही पर्यटक जखमी झाले आहेत. या प्रकारामुळे परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. प्राथमिक माहितीनुसार, किल्ल्यावर फिरण्यासाठी आलेल्या पर्यटकांच्या एका समूहाजवळ अचानक मधमाशांचे मोठे मोहळ भडकले. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे पर्यटकांमध्ये घबराट पसरली. काही पर्यटकांनी तातडीने सुरक्षित ठिकाणी धाव घेतली, तर काहींना मधमाशांच्या दंशामुळे दुखापत झाली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन पथक घटनास्थळी दाखल झाले. जखमी पर्यटकांना तातडीने किल्ल्यावरून खाली आणण्यासाठी बचावकार्य हाती घेण्यात आले. उपलब्ध वाहनांच्या मदतीने तसेच आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या सहाय्याने जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेत आतापर्यंत सुमारे ७ ते ८ पर्यटकांना उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. पुढील तपास सुरू असून पर्यटकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## उपसभापतीपदी मंगेश सावंत

# खेड पंचायत समितीच्या सभापतीपदी विद्या मोहिते

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर** : खेड पंचायत समितीच्या सभापतीपदी शिवसेनेच्या विद्या सयाजी मोहिते तर उपसभापतीपदी मंगेश गुलाब सावंत यांची निवड झाली. सोमवारी (दि. ९) झालेल्या निवडणुकीत दोघांनाही प्रत्येकी ९ मते मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सभापतीपदाच्या उमेदवार अश्विनी तरस तसेच उपसभापतीपदाचे उमेदवार निखिल थोरवे यांना प्रत्येकी ७ मते मिळाली.

मतदान बोट दाखवून पद्धतीने घेण्यात आले. निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी अनिल दौंडे यांनी निकाल जाहीर केला.



निकाल जाहीर होताच पंचायत समिती परिसरात सभापती विद्या मोहिते आणि उपसभापती मंगेश सावंत यांच्या समर्थकांनी भंडाराची उधळण करीत जल्लोष केला. यावेळी आमदार बाबाजी काळे, जिल्हा परिषद सदस्य विजयसिंह शिंदे पाटील, तनुजाताई घनवट, दीप्तीताई भोगाडे, विनयाताई मुंगसे, गणेश आरगडे आदी उपस्थित होते.

नुकत्याच झालेल्या पंचायत समिती निवडणुकीत खेड तालुक्यातील १६ पैकी ९ जागांवर विजय मिळवत आमदार बाबाजी काळे यांच्या नेतृत्वाखाली पंचायत समितीवर शिवसेनेचा झेंडा फडकला आहे. सभापती आणि उपसभापती निवडीसाठी झालेल्या सभेत शिवसेनेचे ९, राष्ट्रवादी काँग्रेसचे ६ आणि शिंदे गटाचा १ सदस्य उपस्थित होता. प्रांताधिकारी अनिल दौंडे आणि गटविकास अधिकारी विशाल शिंदे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सभेचे कामकाज पाहिले. निवडीनंतर पंचायत समिती आवारात विजयी सभा घेण्यात आली.

दरम्यान, नवनिर्वाचित सभापती विद्या मोहिते या शेलापिंपळगाव येथील असून त्या माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या गावातील आहेत. त्यांचे पती सयाजी मोहिते हे माजी आमदार मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली सलग दोन वेळा बाजार समितीचे संचालक होते.

विधानसभा निवडणुकीपूर्वी बाजार समितीत झालेल्या राजकीय घडामोडीत सयाजी मोहिते यांनी आमदार बाबाजी काळे यांना साथ दिली होती. पंचायत समिती निवडणुकीत विद्या मोहिते यांना शिवसेनेची उमेदवारी देण्यात आली आणि विजयानंतर त्यांना सभापतीपद देण्यात आले. त्यामुळे या निवडीला स्थानिक राजकारणात महत्त्वाचे राजकीय समीकरण मानले जात आहे.

## जिल्हा परिषदेत १२ तारखेला अजित पवार यांना श्रद्धांजली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : पुण्याच्या ग्रामीण विकासात मोठे योगदान देणाऱ्या दिवंगत अजित पवार यांच्या स्मरणार्थ पुणे जिल्हा परिषदेत १२ मार्च रोजी श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेसाठी जिल्हा परिषदेचे सर्वपक्षीय आजी-माजी सदस्य आणि पदाधिकारी एकत्र येणार आहेत.

पंचायतराजचे जनक स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त ही सभा गुरुवारी (दि. १२) सकाळी १० वाजता जिल्हा परिषद मुख्यालयातील शरदचंद्र पवार सभागृहात होणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुणे जिल्हा परिषदेसोबत सुमारे अडीच दशकांचे जिव्हाळ्याचे संबंध राहिले होते. ग्रामीण विकासाशी निगडित असलेल्या या पंचायतराज संस्थेच्या कामकाजावर त्यांचे नेहमीच विशेष लक्ष असायचे. जिल्हा परिषद मुख्यालयासह ग्रामीण भागातील अनेक सरकारी कार्यालयांच्या सुसज्ज व भव्य इमारती उभारण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे.

अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदेत आठ अध्यक्ष आणि आठ उपाध्यक्षांनी काम केले. तसेच विविध विषय समित्यांचे ३२ सभापती, राष्ट्रवादी काँग्रेसचे चार गटनेते, जिल्ह्यातील १३ पंचायत समित्यांमधील १०४ सभापती आणि १०४ उपसभापती, जिल्हा परिषदेचे ३०० सदस्य तसेच पंचायत समित्यांचे जवळपास ६०० सदस्य यांनी विविध पदांवर काम केले आहे. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून देवराम लांडे (जुन्नर), सतीश खोमणे (बारामती), वैशाली आबणे (दौंड), प्रा. सविता दगडे (मुळशी), दत्तात्रय भरणे (इंदापूर), प्रदीप कंद (हवेली), विश्वास देवकाते (बारामती) आणि निर्मला पानसरे (खेड) यांनी काम पाहिले. तर उपाध्यक्ष म्हणून सतीश खोमणे, स्व. सुरेश गोरे, शरद लेंडे, अरुण गिरे, प्रदीप कंद, शुक्राचार्य वांजळे, विवेक वळसे पाटील आणि रणजित शिवतरे यांनी काम केले आहे.

## हवेली पंचायत समितीच्या सभापतीपदी युवराज काकडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी काळभोर** : पुणे जिल्ह्यात प्रतिष्ठेची मानली जाणारी हवेली पंचायत समिती अखेर राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात गेली असून सभापतीपदी युवराज हिरामण काकडे तर उपसभापतीपदी अपक्ष सदस्य विद्या दत्तात्रय गायकवाड यांची बिनविरोध निवड झाली आहे. या निवडीमुळे हवेली तालुक्यातील राजकीय समीकरणांना नवा रंग चढला असून अपक्षाच्या पाठिंब्यामुळे सत्ता स्थापन झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

हवेली पंचायत समितीच्या सभागृहात सोमवारी (दि. ९) सभापती व उपसभापती पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली. सभापती पदासाठी युवराज काकडे तर उपसभापती पदासाठी विद्या गायकवाड यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी यशवंत माने यांनी दोघांचीही बिनविरोध निवड झाल्याची घोषणा केली. निवड जाहीर होताच उपस्थित सदस्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात दोघांचे स्वागत केले. त्यानंतर पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी पंचायत समिती सदस्य मनोज ऊर्फ कृषीराज चौधरी, कोमल कांबळे, सुषमा मुरकुटे, अमोल टेकाळे, युवराज वांजळे यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवडीनंतर बोलताना सभापती युवराज काकडे यांनी हवेली तालुक्यातील विकासकामांना गती देण्यासाठी सर्व सदस्यांना सोबत घेऊन काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. गावागावातील रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य आणि इतर मूलभूत सुविधांवर विशेष भर देत तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले.

उपसभापती विद्या गायकवाड यांनीही सभागृहातील सर्व सदस्यांच्या सहकार्याने तालुक्यातील नागरिकांच्या प्रश्नांवर प्राधान्याने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. पंचायत समितीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विकासाला चालना देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, हवेली पंचायत समितीवर सत्ता स्थापन करण्यासाठी ७ सदस्यांचा बहुमत आवश्यक होते. निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला ६ जागांवर विजय मिळाला होता. त्यामुळे सत्ता स्थापनेसाठी एका सदस्याची कमतरता होती. या पार्श्वभूमीवर अपक्ष सदस्य विद्या गायकवाड यांनी राष्ट्रवादीला पाठिंबा जाहीर केला. त्यांच्या पाठिंब्यामुळे राष्ट्रवादीचे संख्याबळ ७ वर पोहोचले आणि हवेली पंचायत समितीवरील सत्तेचा मार्ग मोकळा झाला.

## मीना नदीचे पात्र झपाट्याने आटत चालले

### आंबेगावच्या पूर्व भागातील शेतीपिकांवर पाण्याचे संकट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागासाठी वरदान ठरलेले मीना नदीचे पात्र उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे झपाट्याने आटत चालले असून पुढील आठवड्यात परिसरातील शेतीपिकांवर पाण्याचे गंभीर संकट ओढवण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. त्यामुळे शेतकरी व नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

तालुक्याच्या पूर्व भागातील रांजणी, वळती, नागापूर आणि शिंगवे ही गावे मोठ्या प्रमाणावर मीना नदीच्या पाण्यावर अवलंबून आहेत. सध्या नदीपात्रात काही प्रमाणात पाणी असले तरी गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या कडक उन्हामुळे पाण्याची पातळी वेगाने घटत आहे. ही परिस्थिती कायम राहिल्यास पुढील २ ते ३ दिवसांत नदीपात्र पूर्णपणे कोरडे पडण्याची शक्यता स्थानिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.



वळती (ता. आंबेगाव) येथील मीना नदीचे पात्र उन्हाळ्यामुळे झपाट्याने आटत चालले आहे. (छाया : किशोर खुडे)

नदीपात्र कोरडे पडल्यास परिसरातील शेतीपिकांना मोठा फटका बसण्याची भीती व्यक्त होत आहे. सध्या या भागात गहू, भाजीपाला तसेच रब्बी हंगामातील इतर पिके अंतिम टप्प्यात असून त्यांना पाण्याची गरज आहे. मात्र नदीतील पाणी संपल्यास पिकांवर पाण्याचा ताण निर्माण होऊन उत्पादन घटण्याची शक्यता शेतकरी व्यक्त करत आहेत.

दरम्यान, या परिस्थितीचा परिणाम गावोगाव सुरू असलेल्या नळ पाणीपुरवठा योजनांवरही होण्याची शक्यता आहे. अनेक गावांमध्ये नदीपात्रातील पाण्यावर आधारित योजना असल्याने पाणी आटल्यास नागरिकांनाही पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू शकते.

परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन जलसंपदा विभागाने योग्य नियोजन करत उन्हाळी आवर्तन सोडावे, अशी मागणी परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## माऊलींच्या पालखी सोहळा प्रमुखपदी ॲड. राजेंद्र उमाप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी** : श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या आषाढी पायी वारी पालखी सोहळा २०२६ साठी माजी प्रमुख विश्वस्त व विद्यमान विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप यांची पालखी सोहळा प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. याबाबतची माहिती मुख्य व्यवस्थापक माऊली वीर यांनी दिली.

श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीच्या मार्च महिन्यातील मासिक सभेत पालखी सोहळा प्रमुखपदासाठी बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्वानुमते ॲड. राजेंद्र उमाप यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. सभेच्या अध्यक्षस्थानी प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे होते. यावेळी विश्वस्त चैतन्य लोंढे, पुरुषोत्तम पाटील आणि ॲड. रोहिणी पवार उपस्थित होते.



ॲड. राजेंद्र उमाप यांनी यापूर्वी महाराष्ट्र व गोवा बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष, चिंचवड देवस्थान ट्रस्टचे माजी विश्वस्त, तसेच जिजामाता महिला सहकारी बँक लि.च्या व्यवस्थापन समितीचे माजी चेअरमन व तज्ज्ञ संचालक म्हणून काम पाहिले आहे. आळंदी देवस्थानचे २०२४ ते २०२५ या कालावधीत ते प्रमुख विश्वस्त होते. तसेच सन २०१३ मध्ये त्यांनी पुणे बार असोसिएशनचे अध्यक्षपदही भूषविले आहे. अलीकडेच त्यांनी पुणे जिल्ह्यात दोन ठिकाणी विधी महाविद्यालये सुरू करून शैक्षणिक क्षेत्रातही काम सुरू केले आहे.


त्यांच्या निवडीचे आळंदीत स्वागत करण्यात आले. आळंदी जनहित फाउंडेशनचे विश्वस्त स्वामी सुभाष महाराज, अध्यक्ष राजेंद्र घुंडरे पाटील तसेच नमामि इंद्रायणी प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. निवडीनंतर उपस्थित पदाधिकाऱ्यांनी श्रींच्या गाभाऱ्यात ॲड. उमाप यांचा सत्कार केला.

## मुक्तादेवी यात्रेनिमित्त मुखवट्याचे नूतनीकरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्यातील वळती गावातील ग्रामदैवत मुक्तादेवी यात्रेनिमित्त ग्रामस्थांनी मुक्तादेवीच्या मुखवट्याचे नूतनीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. गावाच्या धार्मिक परंपरेचे जतन करत यात्रेला अधिक वैभव प्राप्त व्हावे या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

मुखवट्याच्या नूतनीकरणासाठी अंदाजे ३ लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च अपेक्षित आहे. यासाठी गावातील महिला भक्तांना देणगी देण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत महिलांनी स्वेच्छेने प्रत्येकी ११०० रुपये देणगी दिली. महिलांच्या या सहभागामुळे ग्रामदैवताबद्दलची श्रद्धा आणि गावातील एकोप्याची भावना अधोरेखित झाली आहे.



वळती येथील ग्रामदैवत श्री मुक्तादेवीची मूर्ती.

दरवर्षीप्रमाणे यंदाही मुक्तादेवी यात्रेचे आयोजन उत्साहात करण्यात येणार आहे. दि. १६ ते १८ मार्च दरम्यान यात्रेचा कार्यक्रम होणार असून या निमित्ताने तयार करण्यात आलेल्या नव्या मुखवट्याची गावातून सवाद्य भव्य मिरवणूक काढली जाणार आहे. या मिरवणुकीत गावातील महिला मोठ्या संख्येने सहभागी होणार असून पारंपरिक वेशभूषेत टाळ-मृदंगाच्या गजरात मिरवणूक काढली जाणार आहे.

मुक्तादेवी ही वळती गावाची ग्रामदैवता असल्याने या यात्रेला गावात विशेष धार्मिक महत्त्व आहे. यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम, पूजा-अर्चा आणि भक्तिमय वातावरण पाहायला मिळणार आहे. महिला भक्त आणि ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागामुळे यंदाची मुक्तादेवी यात्रा अधिक उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी होणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

## महिला दिन उत्साहात साजरा

# ओतूरच्या चैतन्य विद्यालयात नारीशक्तीचा सन्मान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर** : ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालयात ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महिला दिनाचे महत्त्व आणि स्त्रियांचे सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील योगदान लक्षात घेऊन त्यांचा सन्मान करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम ग्राम विकास मंडळाचे उपाध्यक्ष प्रभाकर तांबे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडल्याची माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.

विद्यालयाची माजी विद्यार्थिनी ऋतुजा रामदास डुंबरे हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत राज्यात द्वितीय तर मुलींमध्ये प्रथम क्रमांक मिळवत कृषी उपसंचालक (वर्ग १) पद मिळविल्याबद्दल तिचा सत्कार करण्यात आला. तसेच पंचायत समिती जुन्नरच्या सदस्यपदी निवड झालेल्या विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी नीलम मनोज आमले (भोरे) यांचाही गौरव करण्यात आला. यासोबतच मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांच्यासह विजया



गडगे, सोनाली माळवे, आशा गाडेकर, शिल्पा भालेराव, वनिता भोर, आसावरी गायकर, सोनाली कांबळे, रंजीता पाटील, सरस्वती भताने, रसिका शेळके, अश्विनी नलावडे, साक्षी देशमुख, आशा डुंबरे आणि निर्मला डोंगरे या शिक्षिकांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी ग्राम विकास मंडळाचे खजिनदार रघुनाथ तांबे, विशाल चौधरी, श्रेया ओतूरकर आणि स्वरा पानसरे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी महिला दिनाची पार्श्वभूमी सांगताना महिलांचे कला, क्रीडा, विज्ञान, संशोधन, राजकारण व शेतीसह विविध क्षेत्रातील योगदान अधोरेखित केले.

सत्काराला उत्तर देताना ऋतुजा डुंबरे व नीलम आमले यांनी आपल्या शाळेचा अभिमान असल्याचे सांगितले. शाळेने दिलेले संस्कार आणि समाजासाठी काम करण्याची प्रेरणा महत्त्वाची ठरल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, जुन्नर तालुक्याचे भाग्यविधाते माजी आमदार स्वर्गीय श्रीकृष्ण तांबे आणि लतानानी तांबे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

या प्रसंगी प्रभाकर तांबे, राजेंद्र डुंबरे, रघुनाथ तांबे, प्रदीप गाढवे, पंकज घोलप, मनोज आमले, नितीन तांबे, संजय हिरे, राजाराम शिंदे, भगवंता घोडे, मंगेश तांबे, संतोष कांबळे, मिलिंद खेत्री, विशाल चौधरी, संतोष सोनवणे, अमित झरेकर, लक्ष्मण दुडे, बाळासाहेब साबळे, देवचंद नेहे, अनिल जवरे, दिनेश ताठे, योगेश फापाळे, विजय खरात, भाऊसाहेब ठोसर, ईश्वर ढमाले, अरविंद आंबरे, प्रसन्न तांबे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रदीप गाढवे यांनी केले, तर सूत्रसंचालन भाऊसाहेब खाडे यांनी केले. आभार अजित डांगे यांनी मानले.

## निमगाव केतकी उपबाजारात पेट्रोल पंप उभारणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इंदापूर** : कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निमगाव केतकी येथील उपबाजार समितीच्या आवारात शेतकरी आणि गावकऱ्यांच्या सुविधेसाठी पेट्रोल पंप उभारण्यात येणार असल्याची घोषणा कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केली. बाजार समितीला निधीची कमतरता भासू देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. निमगाव केतकी येथील उपबाजार समितीच्या आवारात रविवारी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समिती शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून विविध योजना राबवत असल्याचे त्यांनी सांगितले.

सरकारची आर्थिक परिस्थिती आव्हानात्मक असतानाही



शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात आली आहे. पीएम किसान योजनेच्या माध्यमातून देशातील शेतकऱ्यांना ३९ हजार कोटी रुपयांची मदत दिली जात असल्याचेही भरणे यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा बँकेचे व बाजार समितीचे संचालक अप्पासाहेब जगदाळे होते. बाजार समितीचे काम पारदर्शकपणे आणि सर्वांना सोबत घेऊन केले जाते. समितीवर एक रुपयाचेही कर्ज नसल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध योजना राबविण्यात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## सारांश वृत्त

### बसच्या धडकेत २ जण ठार

**नवी दिल्ली:** सोमवारी दिल्लीतील निहाल विहारमध्ये एका भरधाव डीटीसी बसने अनेक वाहनांना धडक दिल्याने दोन जणांचा मृत्यू झाला तर एक जण जखमी झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. या घटनेमुळे निदर्शने सुरू झाली, ज्यादरम्यान संतप्त जमावाने अपघातात सहभागी असलेल्या बसची तोडफोड केली आणि दुसरी डीटीसी बस पेटवून दिली.




### होळीच्या दिवशी हिंसाचाराची घटना

**नवी दिल्ली** : नैऋत्य दिल्लीतील उत्तम नगर येथे होळीच्या दिवशी दोन कुटुंबांमध्ये झालेल्या संघर्षात २६ वर्षीय तरुणाच्या हत्येप्रकरणी दिल्ली पोलिसांनी आणखी सात जणांना अटक केली आहे आणि आणखी एका अल्पवयीन मुलाला अटक केली आहे, असे एका अधिकाऱ्याने सोमवारी सांगितले. ताज्या अटकेसह, या प्रकरणात अटक केलेल्यांची एकूण संख्या १४ झाली आहे. दोन अल्पवयीन मुलांनाही अटक करण्यात आली आहे. एका पोलिस अधिकाऱ्याने इशारा दिला की, सोशल मीडियावर दिशाभूल करणारे, एआय-व्युत्पन्न व्हिडिओ प्रसारित करणाऱ्यांना कारवाईला सामोरे जावे लागेल.

### अभिनेते तमल रॉय चौधरी यांचे निधन




**कोलकाता** : ज्येष्ठ बंगाली चित्रपट आणि दूरदर्शन अभिनेता तमल रॉय चौधरी यांचे सोमवारी निधन झाले, असे कुटुंबीयांनी सांगितले. रॉय चौधरी, जे ८० वर्षांचे होते, त्यांचे दक्षिण कोलकाता येथील त्यांच्या निवासस्थानी झोपेत हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले, असे त्यांनी सांगितले. बंगाली चित्रपटसृष्टीतील एक प्रसिद्ध पात्र अभिनेते, त्यांनी त्यांच्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात रंगभूमीवरून केली आणि आयुष्यभर ते रंगभूमीशी खोलवर जोडले गेले.

## कच्च्या तेलाचा दर १२० डॉलर्सवर

# मध्यपूर्वेतील युद्धामुळे जागतिक तेल संकट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : इराण आणि अमेरिका-इस्रायल यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक ऊर्जा बाजारपेठेत मोठे संकट निर्माण झाले आहे. काही दिवसांतच कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल १२० डॉलर्सपर्यंत पोहोचली असून तज्ज्ञांच्या मते परिस्थिती १९७३ मधील तेल संकटासारखी गंभीर बनत आहे. विशेषतः होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारा तेल पुरवठा विस्कळीत झाल्याने जागतिक अर्थव्यवस्थेबाबत चिंता वाढली आहे. ही स्थिती कायम राहिल्यास जग मोठ्या आर्थिक मंदीकडे जाऊ शकते, असा इशाराही तज्ज्ञांकडून दिला जात आहे.

सध्या जागतिक स्तरावर दररोज सुमारे १०० दशलक्ष बॅरल तेलाचा वापर होतो. मात्र युद्धामुळे या पुरवठा साखळीत मोठा अडथळा निर्माण झाला आहे. यूएस एनर्जी इन्फॉर्मेशन ॲडमिनिस्ट्रेशनच्या माहितीनुसार होर्मुझच्या सामुद्रधुनीतून दररोज सुमारे २० दशलक्ष बॅरल तेलाची वाहतूक होते, जे जगाच्या एकूण तेल वापराच्या सुमारे २० टक्के आहे. त्यामुळे या सामुद्रधुनीतील अडथळ्यामुळे संपूर्ण जागतिक ऊर्जा बाजारपेठेवर परिणाम होत आहे.

या मार्गावर अवलंबून असलेल्या आशियाई देशांमध्ये चिंता अधिक वाढली आहे. चीन, भारत, जपान आणि दक्षिण कोरिया या देशांचा मोठा तेल पुरवठा होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होतो. या देशांचा जवळपास अर्धा तेल पुरवठा याच मार्गावर अवलंबून आहे. त्यामुळे हा पुरवठा दीर्घकाळ विस्कळीत राहिल्यास या देशांना सर्वप्रथम त्याचा फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बाजारपेठेतील तज्ज्ांच्या मते, होर्मुझची सामुद्रधुनी बंद राहिली तर जागतिक तेल पुरवठ्यातील हा सर्वात मोठा अडथळा ठरेल आणि त्याचे परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागतील.

तज्ज्ञांचे म्हणणे आहे की हे संकट १९७३ मधील तेल संकटापेक्षाही मोठे ठरू शकते. त्या काळात जगाची तेलाची गरज तुलनेने कमी होती. तेव्हा होर्मुझ मार्गे सुमारे ४.५ ते ५ दशलक्ष बॅरल तेलाचा पुरवठा होत होता. त्यानंतर इराणी क्रांतीच्या काळात हा आकडा सुमारे ६ दशलक्ष बॅरलपर्यंत पोहोचला होता. मात्र आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. जागतिक अर्थव्यवस्था आणि उद्योगधंदे मोठ्या प्रमाणावर तेलावर अवलंबून असल्याने सध्याचे संकट अधिक गंभीर ठरू शकते.

याशिवाय या संघर्षामुळे गॅस पुरवठ्याचाही प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. जर होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे बंद झाली तर तेलासोबतच नैसर्गिक वायू आणि इतर इंधनांच्या पुरवठ्यावरही परिणाम होईल. त्यामुळे अनेक देशांमध्ये इंधन तुटवडा निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तथापि, या संकटात काही प्रमाणात दिलासा देणारी बाब म्हणजे सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीसारखे देश पर्यायी मार्गांनी तेल पुरवठा सुरू ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे काही प्रमाणात पुरवठा सुरू राहण्याची शक्यता आहे. मात्र या मार्गांमुळे वाहतूक खर्च वाढणार असल्याने तेलाच्या किमतीत आणखी वाढ होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

भारतासाठीही ही परिस्थिती चिंतेची ठरत आहे. देश आपल्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्के कच्चे तेल आयात करतो. त्यामुळे मध्यपूर्वेतील तणाव आणि पुरवठा विस्कळीत झाल्यास भारतावर त्याचा थेट परिणाम होऊ शकतो. केंद्र सरकार आणि ऊर्जा क्षेत्रातील संस्था परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून पर्यायी पुरवठा मार्गांचा विचार सुरू असल्याची माहिती समोर येत आहे.

## इराणचे आयआरआयएस लावन कोची बंदरात असल्याचे मान्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : इराणच्या नौदलाचे 'आयआरआयएस लावन' हे जहाज कोची बंदरात थांबण्यास भारताने परवानगी दिली असून हा निर्णय मानवतावादी भूमिकेतून घेण्यात आल्याचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी संसदेत स्पष्ट केले. मध्यपूर्वेतील सध्याच्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेणे आवश्यक होते, असेही त्यांनी सांगितले.

राज्यसभा आणि लोकसभा या दोन्ही सभागृहांना माहिती देताना जयशंकर म्हणाले की, २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हल्ले सुरू केल्यानंतर इराणने आपल्या तीन जहाजांसाठी भारताकडे आश्रय मागितला होता. भारताने १ मार्च रोजी ही विनंती मान्य केली. त्यानुसार ४ मार्चपासून 'आयआरआयएस लावन' हे जहाज कोची बंदरात दाखल झाले आहे.

या जहाजावरील १८३ कर्मचाऱ्यांची व्यवस्था भारतीय नौदलाच्या केंद्रात करण्यात आली आहे. कठीण काळात केलेली ही मदत योग्य पाऊल असल्याचे जयशंकर यांनी नमूद केले. भारताने दिलेल्या मदतीबद्दल इराणनेही आभार व्यक्त केले असल्याची माहिती त्यांनी दिली.

दरम्यान, भारतातील इराणचे राजदूत मोहम्मद फताली यांनीही भारत सरकार आणि स्थानिक प्रशासनाचे आभार मानले आहेत. अमेरिकन सैन्याने इराणी नौदलाचे 'आयआरआयएस देना' हे जहाज बुडवल्यानंतर त्यांनी ही प्रतिक्रिया दिली. तांत्रिक आणि आवश्यक व्यवस्था करण्यासाठी 'आयआरआयएस लावन' हे जहाज कोची बंदरात आले असून जहाजाला थांबण्याची परवानगी देणे आणि कर्मचाऱ्यांना मदत करणे ही मोठी मदत असल्याचे त्यांनी सांगितले.

## सीबीआयच्या याचिकेवर १६ मार्चला सुनावणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया आणि इतर २१ जणांना दारू धोरण प्रकरणातून निर्दोष मुक्त करण्याच्या विरोधात केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय)ने दाखल केलेल्या पुनर्विचार याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयात सोमवारी सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने सीबीआय अधिकाऱ्यांबाबत कनिष्ठ न्यायालयाने केलेल्या "पूर्वग्रहदूषित" टिप्पणीच्या अंमलबजावणीला स्थगिती देण्याचे संकेत दिले.

न्यायमूर्ती स्वर्ण कांता शर्मा यांनी केजरीवाल, सिसोदिया आणि इतर आरोपींना सीबीआयच्या याचिकेबाबत त्यांची भूमिका मांडण्यास सांगितले असून पुढील सुनावणी १६ मार्च रोजी ठेवली आहे.

या प्रकरणाशी संबंधित अंमलबजावणी संचालनालयाने तपास करत असलेल्या मनी लॉंड्रिंग प्रकरणाची सुनावणी पुढील तारखेपर्यंत पुढे ढकलण्याचेही न्यायालयाने आदेश दिले. सुनावणीदरम्यान सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सीबीआयच्या याचिकेवर अंतिम निर्णयासाठी वेळ निश्चित करण्याची विनंती न्यायालयाला केली. उत्पादन शुल्क धोरण प्रकरण हे मोठ्या घोटाळ्यांपैकी एक असून त्यात भ्रष्टाचाराचे स्पष्ट संकेत असल्याचा आरोप त्यांनी केला. केजरीवाल, सिसोदिया आणि इतर आरोपींविरुद्ध आरोप निश्चित करण्यासाठी पुरेसे पुरावे असून दारू धोरणात फेरफार करण्यासाठी कट रचणे आणि लाचखोरीचे पुरावे सीबीआयने गोळा केल्याचेही मेहता यांनी न्यायालयात सांगितले.

दरम्यान, २७ फेब्रुवारी रोजी कनिष्ठ न्यायालयाने केजरीवाल, सिसोदिया आणि इतर २१ जणांना निर्दोष मुक्त केले होते. तपास न्यायालयीन छाननीत टिकू शकला नाही, अशी कठोर टीका करत न्यायालयाने सीबीआयच्या तपास पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

## इराण-अमेरिका युद्धाची व्याप्ती वाढली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : इराणवर अमेरिकन आणि इस्रायली हल्ल्यानंतर मध्यपूर्वेतील संघर्ष अधिक तीव्र झाला असून इराणने गेल्या १० दिवसांपासून आखाती देशांवर सतत हल्ले सुरू ठेवले आहेत. या हल्ल्यांमध्ये केवळ अमेरिकन लष्करी तळांनाच लक्ष्य केले गेले नाही, तर सौदी अरेबिया आणि इतर देशांतील तेल प्रकल्प तसेच निवासी भागांवरही क्षेपणास्त्रे आणि ड्रोन हल्ले करण्यात आले आहेत. आतापर्यंत आखाती देशांनी संयमाची भूमिका घेत दोन्ही बाजूंना चर्चेचे आवाहन केले होते. मात्र सतत सुरू असलेल्या हल्ल्यांमुळे या देशांचा संयम सुटू लागल्याचे दिसत आहे.

रविवारी सौदी अरेबियातील तेल प्रकल्प आणि निवासी भागांवर झालेल्या हल्ल्यांचा तीव्र निषेध करत सौदी अरेबियाने इराणला कडक इशारा दिला आहे. सौदी अरेबियाने स्पष्ट केले की, अरब देशांवर हल्ले सुरूच राहिले तर इराणला "सर्वात मोठे नुकसान" सहन करावे लागेल. सौदी अरेबियाच्या प्रमुख शायबा तेल क्षेत्राला लक्ष्य करत करण्यात आलेल्या नव्या ड्रोन हल्ल्यानंतर हा इशारा देण्यात आला. दरम्यान, शनिवारी इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्किआन यांनी आखाती देशांवर हल्ले थांबवल्याचा दावा केला होता, मात्र सौदी अरेबियाने तो फेटाळून लावला आहे.

सौदी अरेबियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की इराणने केलेल्या घोषणांचे पालन केलेले नाही. राष्ट्रपतींच्या भाषणादरम्यान किंवा त्यानंतरही हल्ले सुरूच राहिले आहेत. कोणतेही ठोस कारण नसताना इराणने आक्रमक कारवाया सुरू ठेवल्याचा आरोप सौदी अरेबियाने केला आहे. या हल्ल्यांमुळे तणावात आणखी वाढ होईल आणि त्याचे सध्याच्या तसेच भविष्यातील संबंधांवर गंभीर परिणाम होतील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, या संघर्षात संयुक्त अरब अमिरातीनेही थेट सहभाग घेतल्याचे वृत्त समोर आले आहे. संयुक्त अरब अमिरातीने इराणमधील एका डिसॅलिनेशन प्लांटवर हल्ला केल्याची माहिती आहे. हा हल्ला इराण आणि अमिराती यांच्यातील तणावात मोठी वाढ दर्शवणारा मानला जात आहे. या घटनेची अधिकृत पुष्टी झाल्यास इराणविरुद्ध थेट लष्करी कारवाई करणारा तो दुसरा पर्शियन आखाती देश ठरेल. तसेच इराणी ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांविरोधात अबू धाबीने केलेला हा पहिला प्रत्युत्तरात्मक हल्ला मानला जाईल.

## मध्यपूर्वेतील तणावाचा बाजारांवर परिणाम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी उसळी घेतली असून त्याचा परिणाम जागतिक तसेच भारतीय शेअर बाजारांवर दिसून येत आहे. कच्च्या तेलाच्या किमती रात्रभर सुमारे २५ टक्क्यांपर्यंत वाढल्याने महागाई वाढण्याची भीती निर्माण झाली आहे. विशेषतः ऊर्जा गरजांसाठी आयातीत तेलावर अवलंबून असलेल्या भारतासारख्या देशांसाठी ही परिस्थिती चिंताजनक मानली जात आहे.

होर्मुझ सामुद्रधुनी बंद राहिल्यामुळे आणि तेल व वायू पायाभूत सुविधांवर तसेच जहाजांवर झालेल्या हल्ल्यांमुळे ब्रेंट क्रूडचा दर प्रति बॅरल ११८ डॉलरपर्यंत पोहोचला आहे. यामुळे जागतिक पुरवठा साखळीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

सोमवारी सकाळी भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण पाहायला मिळाली. बीएसई सेन्सेक्स जवळपास २,५०० अंकांनी घसरून ७७,०५७ या पातळीवर पोहोचला, तर एनएसई निफ्टी५० निर्देशांक ७५० अंकांहून अधिक घसरून २३,७०० च्या खाली आला. निफ्टी५०मधील कोल इंडिया वगळता उर्वरित ४९ शेअर्समध्ये घसरण झाली.

इंडिगो, टाटा मोटर्स, एसबीआय, टाटा स्टील आणि श्रीराम फायनान्स या कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी घसरण झाली.

आशियाई बाजारांमध्येही मोठा पडसाद उमटला असून प्रमुख निर्देशांकांमध्ये ५ ते ८ टक्क्यांपर्यंत घसरण नोंदवली गेली. दक्षिण कोरियाच्या कोस्पी निर्देशांकाने चार ट्रेडिंग सत्रांत दुसऱ्यांदा लोअर सर्किट गाठले. तर अमेरिकेत शुक्रवारी झालेल्या विक्रीनंतर डाऊ फ्युचर्समध्ये सुमारे १,१०० अंकांची घसरण दिसून आली.

## सर्वोच्च न्यायालयात नव्या याचिकेवर सुनावणी

# पश्चिम बंगाल एसआयआर मोहीम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या विशेष सघन सुधारणा (एसआयआर) प्रक्रियेदरम्यान मतदार यादीतून नावे वगळण्यात आलेल्या काही व्यक्तींनी दाखल केलेल्या नव्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी विचार करण्यास सहमती दर्शवली आहे. मतदार यादीतून नाव वगळण्यात आलेल्या नागरिकांनी न्यायालयात धाव घेतल्याने या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर ही याचिका मांडण्यात आली. ज्येष्ठ वकील मनेका गुरुस्वामी यांनी याचिकाकर्त्यांच्या वतीने बाजू मांडताना सांगितले की, संबंधित व्यक्ती पूर्वी मतदार यादीत नोंद असलेले मतदार होते आणि त्यांनी मतदानही केले आहे. मात्र आता त्यांची नावे यादीतून वगळण्यात आली असून त्यांच्या कागदपत्रांचीही दखल घेतली जात नाही.

यावर सरन्यायाधीशांनी निरीक्षण नोंदवत सांगितले की न्यायिक अधिकाऱ्यांच्या निर्णयांविरोधात थेट अपील करता येत नाही. त्यावर वरिष्ठ वकिलांनी ही याचिका ग्राह्य धरता येण्यासारखी असल्याचे सांगितले. त्यानंतर खंडपीठाने या प्रकरणावर मंगळवारी सुनावणी घेण्याचे मान्य केले. २४ फेब्रुवारी रोजी सर्वोच्च न्यायालयाने पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या एसआयआर प्रक्रियेदरम्यान मतदार यादीतून नावे वगळण्यासंबंधी दाखल झालेल्या मोठ्या प्रमाणातील दावे आणि आक्षेप हाताळण्यासाठी अतिरिक्त न्यायिक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यास परवानगी दिली होती. राज्यातील २५० जिल्हा न्यायाधीशांव्यतिरिक्त दिवाणी न्यायाधीशांची नियुक्ती करण्यास तसेच झारखंड आणि ओडिशा येथील न्यायिक अधिकाऱ्यांची मदत घेण्यास न्यायालयाने मान्यता दिली होती. कलकत्ता उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश सुजॉय पॉल यांनी २२ फेब्रुवारी रोजी पाठवलेल्या पत्राची सर्वोच्च न्यायालयाने दखल घेतली होती. या पत्रात एसआयआर प्रक्रियेत सुमारे ८० लाख दावे आणि आक्षेप दाखल झाल्याचे नमूद करण्यात आले होते. सध्या नियुक्त असलेल्या २५० जिल्हा न्यायाधीशांना या सर्व दावे आणि आक्षेप निकाली काढण्यासाठी सुमारे ८० दिवस लागू शकतात, असेही पत्रात सांगण्यात आले होते.

या प्रक्रियेदरम्यान २००२ च्या मतदार यादीशी जोडलेल्या संतती नोंदींमध्ये अनेक तार्किक विसंगती आढळल्याचेही नमूद करण्यात आले आहे. यामध्ये मतदार आणि त्यांच्या पालकांच्या नावांमधील विसंगती तसेच मतदार आणि पालकांच्या वयातील फरक १५ वर्षांपेक्षा कमी किंवा ५० वर्षांपेक्षा जास्त असणे यांसारख्या बाबींचा समावेश आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार, प्रत्येक न्यायिक अधिकाऱ्याने दररोज सुमारे २५० दावे आणि आक्षेपांची सुनावणी केली तरी संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी सुमारे ८० दिवस लागू शकतात, असे मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी नमूद केले.

## पश्चिम बंगाल निवडणुका निष्पक्ष व्हाव्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगालमधील विरोधी पक्ष भाजप आणि माकपने सोमवारी भारतीय निवडणूक आयोगाला एप्रिलमध्ये होणाऱ्या राज्य विधानसभा निवडणुका हिंसाचारमुक्त आणि निष्पक्षपणे पार पाडण्याची विनंती केली.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखालील निवडणूक आयोगाच्या पूर्ण खंडपीठाने आज राज्यातील २९४ विधानसभा मतदारसंघांमध्ये निवडणुका घेण्यासंदर्भात त्यांच्या चिंता आणि सूचना ऐकण्यासाठी मुख्य विरोधी पक्ष भाजप, सीपीआय-एम आणि काँग्रेसच्या शिष्टमंडळांसोबत स्वतंत्रपणे बैठका घेतल्या.

जगन्नाथ चट्टोपाध्याय, शिशीर बाजोरिया आणि इतर नेत्यांचा समावेश असलेल्या भाजप शिष्टमंडळाने कुमार, तसेच निवडणूक आयुक्त एस.एस. संधू आणि विवेक जोशी यांच्या पूर्णपीठासमोर १६ कलमी मागण्यांचे निवेदन सादर केले.

या निवेदनात राज्यातील आगामी निवडणुकांपूर्वी सुरक्षेच्या मुद्द्यांवर विशेष भर देण्यात आला.

मतदार यादीच्या विशेष सघन सुधारणा प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर या महत्त्वाच्या निवडणुका होणार आहेत. या प्रक्रियेमुळे सुमारे ६४ लाख मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आली असून ६० लाख मतदारांना 'निर्णयाधीन' श्रेणीत ठेवण्यात आले आहे. भाजपच्या प्रतिनिधींनी सांगितले की, राज्यात एक ते तीन टप्प्यांत निवडणुका घेण्याची मागणी त्यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे. राज्यात तैनात असलेल्या केंद्रीय दलांच्या सुमारे ४०० कंपन्यांचा प्रभावी वापर आणि सक्रिय तैनाती याबाबतही त्यांनी चिंता व्यक्त केली. राज्य पोलिस केंद्रीय दलांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवत आहेत. त्यामुळे संवेदनशील भागांऐवजी तुलनेने शांत भागांत केंद्रीय दलांचे रूट मार्च होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.पक्षाचे सचिव मोहम्मद सलीम यांच्या नेतृत्वाखालील सीपीआय-एमच्या शिष्टमंडळानेही निवडणूक आयोगाच्या पूर्णपीठाची भेट घेतली आणि आपले निवेदन सादर केले. ६० लाख मतदारांना 'निर्णयाधीन' म्हणून वर्गीकृत केल्याबद्दल गंभीर आक्षेप त्यांनी घेतला आहे.

## कोची येथे ग्राफीन परिषद सुरू

**कोची** : ग्राफीन आणि द्विमितीय (२डी) साहित्यांवरील आंतरराष्ट्रीय परिषद आणि प्रदर्शन, ग्राफिन २०२६ ची पहिली आवृत्ती सोमवारी येथे सुरू झाली, ज्यामध्ये जगभरातील शास्त्रज्ञ, तंत्रज्ञान नवोन्मेषक आणि उद्योग प्रतिनिधींना पुढील पिढीतील साहित्यांमधील प्रगतीवर चर्चा करण्यासाठी एकत्र आणले गेले. सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने सेंटर फॉर मटेरियल्स फॉर इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून ही परिषद भरविण्यात आली आहे.

## सरन्यायाधीश सूर्यकांत संतापले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने एका वकिलाने दाखल केलेली जनहित याचिका फेटाळून लावत ती विचाराच्या अभावाचे उदाहरण असल्याची तीव्र टीका केली. या याचिकेत अल्कोहोलसाठी वैद्यकीय प्रिस्क्रिप्शन अनिवार्य करणे, मांसाहारी अन्नावर नियम लागू करणे तसेच मालमत्ता नोंदणीसंदर्भातील काही मुद्दे मांडण्यात आले होते.

सोमवारी (दि. ९) झालेल्या सुनावणीदरम्यान या याचिकेतील विविध मागण्या पाहून सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी नाराजी व्यक्त केली. सुरुवातीलाच त्यांनी याचिकेवर सुनावणी करण्यास नकार देत ती विचाराच्या अभावाचे उत्तम उदाहरण असल्याचे नमूद केले. याचिकाकर्त्याच्या वकिलाला त्यांनी विचारले, "तुम्ही या याचिका मध्यरात्री तयार करता का?" त्यानंतर खंडपीठाने ही याचिका फेटाळून लावली. न्यायालयाने नमूद केले की या याचिकेतील मागण्या अस्पष्ट आणि निराधार असून हा खराब मसुदा तयार करण्याचा नमुना आहे. जर याचिकाकर्ता वकील नसता तर न्यायालयाने त्याच्यावर मोठा दंड ठोठावला असता, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायालयाने म्हटले की अशा प्रकारच्या अनौपचारिक आणि असंबद्ध याचिका दाखल करून वेळ वाया घालवला जात आहे. त्यामुळे पुढील वेळी अशा प्रकारची याचिका दाखल केल्यास मोठा दंड आकारला जाईल, असा इशाराही सरन्यायाधीशांनी दिला.

## स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटच्या ताज्या अहवालानुसार

# भारत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा शस्त्रास्त्र आयातदार

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली** : स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटच्या ताज्या अहवालानुसार युक्रेननंतर भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा शस्त्रास्त्र आयातदार देश ठरला आहे. मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये इतक्या मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्र आयात करणारा भारत हा एकमेव देश असल्याचेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

थिंक टँकच्या माहितीनुसार रशिया, फ्रान्स आणि इस्रायल हे भारताचे प्रमुख शस्त्रास्त्र पुरवठादार देश आहेत. भारताच्या एकूण शस्त्रास्त्र आयातीपैकी सुमारे ४० टक्के पुरवठा रशियाकडून, २९ टक्के फ्रान्सकडून आणि १५ टक्के इस्रायल कडून केला जातो.

आकडेवारीनुसार २०२१ ते २०२५ या कालावधीत जागतिक शस्त्रास्त्र आयातीत भारताचा वाटा ८.३ टक्के होता. त्यामुळे भारत या यादीत दुसऱ्या स्थानावर आहे. याच कालावधीत रशियाशी युद्धात गुंतलेल्या युक्रेनचा वाटा ९.७ टक्के असून तो या यादीत अव्वल स्थानावर आहे.

सोमवारी प्रसिद्ध झालेल्या 'ट्रेंड्स इन इंटरनॅशनल आर्म्स ट्रान्सफर, २०२५' या अहवालात भारताच्या शस्त्रास्त्र आयातीतील काही प्रमाणातील घटही नोंदवण्यात आली आहे. २०१६ ते २०२० या कालावधीच्या तुलनेत २०२१ ते २०२५ या कालावधीत भारताच्या शस्त्रास्त्र आयातीत सुमारे ४ टक्क्यांनी घट झाली आहे.

अहवालानुसार या घटेमागील एक प्रमुख कारण म्हणजे भारताची स्वतःच्या शस्त्रास्त्र प्रणालींची रचना आणि उत्पादन करण्याची वाढती क्षमता होय. देशांतर्गत संरक्षण उत्पादन कार्यक्रमांना अनेकदा विलंब होत असला तरी भारत हळूहळू स्वदेशी उत्पादनाकडे वळत असल्याचे यात नमूद केले आहे.

तथापि, अनेक महत्त्वाच्या लष्करी प्लॅटफॉर्मसाठी भारत अजूनही परदेशी पुरवठादारांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असल्याचेही अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. फ्रान्सकडून १४० लढाऊ विमाने आणि जर्मनीकडून सहा पाणबुड्यांच्या प्रस्तावित खरेदीसारख्या मोठ्या ऑर्डरमुळे भारताचे परदेशी पुरवठादारांवरील अवलंबित्व कायम असल्याचे यात म्हटले आहे.

गेल्या दशकात भारताने संरक्षण खरेदीच्या स्रोतांमध्ये काही प्रमाणात विविधता आणली आहे. रशियावरील पारंपरिक अवलंबित्व कमी करत भारताने फ्रान्स, इस्रायल आणि अमेरिका यांसारख्या पाश्चात्य देशांकडून शस्त्रास्त्र खरेदी वाढवली आहे. आकडेवारीनुसार भारतीय शस्त्रास्त्र आयातीमध्ये रशियाचा वाटा २०११ ते २०१५ या कालावधीत ७० टक्के होता. तो २०१६ ते २०२० या कालावधीत ५१ टक्क्यांपर्यंत कमी झाला आणि २०२१ ते २०२५ दरम्यान तो आणखी घसरून ४० टक्क्यांवर आला आहे.

अहवालात भारताच्या संरक्षण खरेदीवर चीन आणि पाकिस्तानसोबतच्या सुरक्षा स्पर्धेचा मोठा प्रभाव असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या दोन्ही देशांबरोबर असलेले तणाव आणि अधूनमधून होणारे सीमावाद भारताला लष्करी क्षमता वाढवण्यास भाग पाडत असल्याचे स्पष्ट केले आहे.